PDF Compressor Free Version

**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकार्यालय**
बंगला नं.10/2, स्टाफ्री टाऊन, सदर, मंगळवारी मार्केटचे जवळ, नागपूर – 440 001
दूरध्वनी क्र.0712 2978844, E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in
प्र.मु.व.सं.(व.ब.प्र.).म.रा.,वनभवनरामगिरीरोड सिव्हीललाईन्स,नागपूर-440001

विषय:- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या
दिनांक १६/१०/२०१९च्या सभेचा कार्यवृत्तांत.

क्रमांक-व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.१०/ 390 /१९-२०
नागपूर-४४० ००१, दिनांक : 22 ऑक्टोबर, २०१९

प्रति,

1. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
2. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि. नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
4. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
5. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
6. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
7. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (महा कॅम्पा), महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य,कार्यकारी समिती.
8. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई, सदस्य, कार्यकारी समिती.
9. श्री संजय करकरे, सदस्य, कार्यकारी समिती तथा सहाय्यक संचालक,बी.एन.एच.एस.बी-1,वंदन अपार्टमेंट,रामदासपेठ, नागपूर
10. श्रीनिधी नांदेडकर अँण्ड असोसिएट्स, सदस्य, कार्यकारी समिती , 103, उत्कर्ष उमा, अजनी चौक, नागपूर-440015
11. प्रो. निशी के. मुखर्जी, सदस्य, कार्यकारी समिती , 46,रामदासपेठ,लोकमत बिल्डींगजवळ, नागपूर
12. श्री दिलीप आर. चिंचमलातपुरे, सदस्य, कार्यकारी समिती, नवनतारा 28, अध्यापक लेआऊट, जोग हॉस्पिटॅलिटीचे जवळ, मंगलमूर्ती चौक, रिंग रोड, नागपूर-440 036.
13. श्री. अरुण तिखे, सदस्य, कार्यकारी समिती, 29 रचटाटे लेआऊट, दाताळा रोड, रामनगर, चंद्रपूर

संदर्भ – या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष 6/लले/ व्यसं/मनिपविमं-सभा/भाग-3/299/19-20
दिनांक 09/10/2019

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची सभा, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

PDF Compressor Free Version

नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६ ऑक्टोबर २०१९ रोजी "कमांड कंट्राल रुम" वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

*सहपत्र:- वरील प्रमाणे.*

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

प्रतिलिपी:- सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक) सर्व / मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी:- वनसंरक्षक(प्रादेशिक), यवतमाळ यांना वरील प्रमाणे सहपत्रासह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

प्रतिलिपी:- वनसंरक्षक व उपवनसंरक्षक (वन्यजीव), सर्व / विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) सर्व यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

प्रत – कक्ष-२, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक १६/१०/२०१९ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची दिनांक १६ ऑक्टोबर, २०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **"कमांड कंट्रोल रुम "** वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेस उपस्थित कार्यकारी समिती सदस्यांची यादी ***(परिशिष्ट-१)*** नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी ***नवव्या सभेच्या*** सुरुवातीस अध्यक्षांचे स्वागत केले व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे देखील स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

राज्य निसर्ग पर्यटन धोरण २००८, केंद्र शासनाने प्रसृत केलेल्या सुचना व या संबंधातील शासन निर्णय इत्यादींमध्ये निसर्ग पर्यटन विकासाबाबतच्या संकल्पना व सद्यःस्थीतीत राज्यात निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता होत असलेली कामे याबाबत सद्यःस्थीतीचा आढावा **सभे समोर सादर केला.** निसर्ग पर्यटन धोरणामध्ये उद्धृत केल्यानुसार स्थानिक संस्कृती, निसर्गाशी जवळीक, स्थानिकांचा सहभाग, निसर्गाचे संवर्धन कायम राखुन स्थानिकांना रोजगाराची संधी मिळवुन देणे व स्थानिकांच्या सहभागाने स्वयंचलीत पध्दतीने निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास करणे व यातुन जनसामान्यांमध्ये निसर्गाविषयी जागृकता निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट सद्यःस्थीतीत पूर्णतः साध्य होत नसल्याचे सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले.

**विषय क्र.१:- दिनांक १५/१२/२०१८ रोजी "टकले सभागृह", वनभवन, नागपूर येथे संपन्न झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**

PDF Compressor Free Version

दिनांक १५/१२/२०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचा मंजूर कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष./मनिपविमं-सभा/प्रक्र.१०/२२५/२०१८-१९ दिनांक २० डिसेंबर २०१८ अन्वये सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आलेला आहे. सदर कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्याकडुन कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणाबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच सदस्य-सचिव यांचे सुचनेनुसार मागील सभेच्या कार्यवृत्तांताची श्री. किशोर मिश्रीकोटकर, वि.व.अ.,मनिपविम यांनी समितीस माहिती दिली व ते कायम करण्याबाबत विनंती केली. उपस्थित समिती सदस्यांच्या संमतीने **अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात आले.**

दिनांक १५/१२/२०१८ ला संपन्न झालेल्या सभेत कार्यकारी घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत सादर करण्यात आला.

१) शालेय विद्यार्थ्यांकरीता निसर्गानुभव कार्यक्रम राबविणेबाबतः-

निसर्गानुभव कार्यक्रम मा. मंत्री महोदयांचा प्राधान्यक्रम असलेला कार्यक्रम असून या कार्यक्रमाव्दारे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी जागृकता निमार्ण होत असल्याचे यापूर्वी घेतलेल्या कार्यक्रमाव्दारे निदर्शनास आले आहे. हा अनुभव लक्षात घेऊन राज्यात सन २०१९-२० मध्ये हा कार्यक्रम राबविण्यात यावा असे मा. अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी सुचीत केले. **याकरीता आवश्यक निधी कॅम्पा कडून निसर्ग पर्यटन मंडळाला उपलब्ध करुन देणे ऐवजी प्रत्येक वन वृत्त निहाय मागणी नुसार त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावा अशा सुचना दिल्या.**

**विषय क्र.२:-** Preparation of Vision document for the development of eco-tourism In Maharashtra **यावर चर्चा तसेच तज्ञ सल्लागाराचे नियुक्तीस मान्यता देणे.**

निसर्ग पर्यटन स्थळांच्या सर्वकष विकासाच्या दृष्टीने व या संबंधात निसर्ग पर्यटन धोरणामध्ये नमुद उदिष्ट पुर्तो व्हावी याकरीता मंडळाकडे प्राप्त निसर्ग पर्यटन स्थळांच्या अंदाजे ३५० स्थळांच्या यादीतुन ५० स्थळांची निवड करण्यात आली व त्या स्थळांची सद्यःस्थिती, स्थळांचे महत्व, वैशिष्ट,

PDF Compressor Free Version

तेथे उपलब्ध सुविधा, पर्यटकांची संख्या, पर्यटन स्थळांचा परीपुर्ण विकास होण्याकरीता आवश्यक बाबी, स्थानिकांचा सहभाग, त्यांची क्षमता बांधणी व त्याकरीता आवश्यक प्रशिक्षण, पर्यटन स्थळनिहाय स्वयंचलीत पध्दत, लगत असलेली पर्यटन / निसर्ग पर्यटन स्थळांचा एकत्रीत विचार करणे (Tour Circuit) व प्रचार व प्रसिध्दी योजना इत्यादी बाबत सर्व्हेक्षण अभ्यास करुन परीपूर्ण अहवाल तयार करण्यात येणार असल्याचे विषद केले.

या करीता शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी-०११७/प्र-१ दिनांक २०/१२/२०१८ अन्वये मान्यता प्राप्त १५ वास्तु विशारद तज्ञांपैकी ७ तज्ञांकडुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी ५ तज्ञांकडुन निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदांचे मुल्यांकन करण्याकरीता त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. समितीतील अध्यक्ष व सदस्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. (१) श्री.चंद्रशेखरन बाला एन, उपवनसंरक्षक (कार्यआयोजना),नागपूर (२) श्री.एस.बी.भलावी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), नागपूर (३) श्री.मिश्रीकोटकर, सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी, मनिमविमं.

निविदांचे मुल्यांकनाकरीता निविदा सुचनापत्रामध्ये नमुद पध्दतीनुसार मुल्यांकन करण्यात येऊन त्या आधारे २ निविदा अस्वीकृत करण्यात आल्या. उर्वरीत ३ निविदाधारकांकडुन नमुद केलेल्या दराचे आधारे मे. Grassroot Research and Consultancy, Andheri East Mumbai यांनी सर्वात कमी दर रु. २५,००,०००/- सर्व करांसहीत नमुद केल्याने त्यांची निविदा मान्य करण्यात आली व त्यांना विहित केलेले काम ९० दिवसाचे आत पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्याचे व्यवस्थापकीय संचालक, मनिमविमं, नागपुर यांनी समितीला सांगितले.

५० निवडक निसर्ग पर्यटन स्थळांचा सर्व्हेक्षण अभ्यास करुन परीपुर्ण अहवाल मंडळास सादर करण्याकरीता नियुक्त मे. Grassroot Research and Consultancy, Andheri East Mumbai तर्फे संचालक डॉ.पल्लवी लाटकर व त्यांचे सहकारी रश्मी सावंत, संचालिका, कल्चर आंगन, पर्यावरण तज्ञ निशिथ धारीया हे उपस्थित होते. त्यांनी सदर सर्व्हेक्षण व अभ्यास या करीता ५ चमु तयार

PDF Compressor Free Version

केल्याचे व प्रत्येक चमु मध्ये ३ तज्ञांचा समावेश असुन साधारणतः प्रत्येक चमु १० निसर्ग पर्यटन स्थळांचे सर्व्हेक्षण व अभ्यास करणार असल्याचे सांगितले व सदर अहवाल विहित मुदतीत मंडळाकडे सादर करण्यात येणार असल्याचे नमुद केले. सादरीकरणा दरम्यान सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे समाधानकारक उत्तर देण्यात आले. व्यवस्थापकीय संचालक सदर कामाकरीता नियुक्त तज्ञ सल्लागाराचे नियुक्ती बाबत कार्यकारी समितीने प्रशंसा केली व सदर नियुक्तीस कार्यकारी समितीने मान्यता प्रदान केली.

सदर सर्व्हेक्षण/अभ्यास करण्याकरीता निवडण्यात आलेल्या ५० निसर्ग पर्यटन स्थळांची यादी बाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती असे निर्देश देण्यात आले की, सदर यादीतील काही पर्यटन स्थळे वगळुन त्या ऐवजी सुचविण्यात आल्यानुसार नवीन स्थळांचा समावेश करण्यात यावा आणि सुधारीत यादी वास्तु सल्लागार यांना सर्व्हेक्षण/अभ्यासा करीता देण्यात यावी.

विषय क्र.३.००:- सन २०१८-१९ मध्ये निधी वाटप झालेल्या प्रस्तावा वरील खर्चाचा तपशिल.

सन २०१७-१८ मध्ये २१ व २०१८-१९ मध्ये २२ असे एकुण ४३ निसर्ग पर्यटन स्थळांची कामे पुर्ण झाल्याबाबत माहिती सभेत देण्यात आली.

यावर सविस्तर चर्चे अंती मा. अध्यक्षांनी असे निर्देश दिले की, सदर सर्व वन वृत्तांचे पालक प्रधान मुख्य वनसंरक्षक/ अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे मार्फत वरील सर्व पर्यटन स्थळांची पाहणी करुन कामे पुर्ण झाले असल्याची खात्री करावी व झालेल्या कामांचे फोटो इत्यादी तपशिलासह अहवाल मंडळाकडे दिनांक १५/११/२०१९ पर्यंत सादर करावा.

सन २०१८-१९ मध्ये राज्यातील निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता एकुण रु. ८४००.०० लक्षचा नियतव्यय मंजुर करण्यात आला होता. मंडळातर्फे एकुण ८७ प्रकल्पाचे रु. ८९६५.१८ लक्षाचे कामाचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात होते. शासनाकडून रु.७३९३.१६ लाख रुपयाचे अनुदान प्राप्त झाले होते. याबाबतची सविस्तर माहिती सभागृहास देण्यात आली.

PDF Compressor Free Version

विषय क्र.४.००:- सन २०१९-२० मध्ये चालुबाब प्रस्तावावर आतापर्यंत करण्यात आलेला खर्च.

सन २०१९-२० करीता एकुण रु. ६४०० लक्ष नियतव्यय मंजुर आहे. त्यापैकी रु १०२९२.७१ लक्ष चे एकुण ६१ प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झाले. त्यापैकी रु. १०५७.२१ लक्ष चे एकुण १६ प्रस्ताव कालावधी संपला असल्याने परत करण्यात आले. एकुण रु ५६७६.७६ लक्षचे १३ प्रस्ताव त्रुटींची पुर्तता करण्याकरीता परत करण्यात आले. एकुण रु.१३८१.३०४ लक्षचे एकुण २१ प्रस्तावास मान्यता मिळाली असुन निधी वितरीत करण्यात आलेला आहे व रु. १२०७.४९ लक्षचे एकुण ८ प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव प्रलंबित आहेत.अशी माहिती सभागृहात समक्ष सादर करण्यात आली.

यावर सभागृहात चर्चा होऊन चर्चे अंती मा. अध्यक्षांनी असे निर्देश दिले की, त्रुटींची पुर्तता करण्याकरीता परत करण्यात आलेले १३ प्रस्ताव दिनांक २५/१०/२०१९ पर्यंत मंडळास सादर करण्याबाबत संबंधीत वृत्ताचे मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक यांना सुचना देण्यात याव्या.

तसेच आराखडयांचा कालावधी संपला असल्याने परत करण्यात आलेले १६ प्रस्तावाबाबत संबंधीत वनवृत्ताचे पालक प्रधान मुख्य वनसंरक्षक /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी पुनर्विलोकन करुन संबंधीत पर्यटन स्थळांवर आतापर्यंत झालेला खर्च वाया जाऊ नये तसेच पर्यटन स्थळांची कामे पुर्ण व्हावी या उद्देशाने एकुण शिल्लक कामांचा आढावा घेऊन आराखडयांचा मुदत वाढीच्या सुधारीत प्रस्तावासह अहवाल मंडळाकडे दिनांक १५/११/२०१९ पर्यंत सादर करावा.

त्याचप्रमाणे अशा पध्दतीने प्राप्त झालेल्या प्रस्तावावार निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी समितीने व्यवस्थापकीय संचालक निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांना देण्यात येत असल्याचा निर्णय घेण्यात आला.

PDF Compressor Free Version

मंडळाची स्वतंत्र Web-Site परिपूर्ण माहितीसह तयार करण्याबाबत मा. अध्यक्ष, कार्यकारी समिती, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सुचना दिल्या.

कार्यकारी समितीने मंडळाचे कामकाजावर समाधान व्यक्त केले.

व्यवस्थापकीय संचालक निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थीतांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर

PDF Compressor Free Version

*परिशिष्ट - १*

**दिनांक १६ ऑक्टोबर २०१९ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या ९ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री. यु. के. अग्रवाल | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २. | श्री. नितीन काकोडकर | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३. | श्री. जी. साईप्रकाश | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ४. | श्री. सुनील लिमये | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई. |
| ५. | श्री. बी. एस.हुडा | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे कार्यालय. |
| ६. | श्री. संजीव गौड | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ७. | श्री. आर. एस. गावंडे | सदस्य प्रतिनिधी | सहा. व्यवस्थापक, एफडीसीएमलि. *तथा* व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएमलि यांचे प्रतिनिधी. |
| ८. | श्री. संजय करकरे | सदस्य | सहाय्यक संचालक, बी.एन.एच.एस.बी.-१, वंदना अपार्टमेंट, रामदासपेठ, नागपूर |
| ९. | प्रो. निर्मी के. मुखर्जी | सदस्य | ४६, रामदासपेठ, लोकमत बिल्डींग जवळ, नागपूर ४४० ०१० |
| ११. | श्री. दिलीप आर.चिंचमलातपुरे | सदस्य | मधुमंजिरी-२८, अध्यापक लेआऊट, जोग हॉस्पिटललिटीचे जवळ, मंगलमुर्ती चौक, रिंग रोड, नागपूर-४४००३६. |
| १२. | श्री. अरूण तिखे | सदस्य | २९, रघटाटे लेआऊट, दाताळा रोड, रामनगर, चंद्रपूर - ०२ |
| १३. | श्री. विकास गुप्ता | सदस्य-सचिव | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक *तथा* व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| १४. | डॉ. पल्लवी लाटकर | संचालक | Grassroot Research and Consultancy |
| १५. | श्री. किशोर मिश्रीकोटकर | | सेवानि. विभागीय वन अधिकारी, मनिपविमं. नागपूर यांचे कार्यालय |